जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाकडुन ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या खालीलप्रमाणे योजना राबविल्या जातात- - -

पाझर तलाव

सिंचन तलाव

गांव तलाव

कोल्हापुर पद्धतीचे बंधारे

उक्त नमुद योजनांची देखभाल व दुरुस्ती

त्यासाठी खालील नमुद योजनांतुन निधीची उपलब्धता होत असते

**जिल्हा वार्षिक योजनेतुन**

१) लघु पाटबंधारे कामे
२) कोल्हापुर पद्धतीचे बंधारे
३) भुसंपादनासाठी रक्कम
४) सर्वेक्षणे
५) O. T. S. P.

**विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम**

१) प्रगतीपथावरील योजना पुर्ण करणे
२) नवीन योजना
३) सिंचन क्षमतांची पुनर्स्थापना
४) शेततळी उपसा सिंचनाने भरणे
५) महात्मा ज्योतिबा फुले जलभुमी संधारण अभियान अंतर्गत मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कोल्हापुर पद्धतीच्या बंधा-यांची दुरुस्ती व परिरक्षण
६) जिल्हा परिषद स्वउत्पन्न निधी (जि. प. सेस फंड)

**विविध प्रकारची कामे घेण्यासाठी निधीच्या उपलब्धते सोबतच साधारणतः खालील निकषांची आवश्यकता असते**

## पाझर तलाव

१) साधारण उताराची व पुरेसे पाणलोट असणारी जागा
२) जमिनीची सहज उपलब्धता
३) साधारण कठीण भुस्तर
४) जमीन पाझरासाठी योग्य असणे गरजेचे
५) योग्य व दर्जेदार बांधकाम साहित्याची उपलब्धता
६) अंदाजपत्रक शासनाने निर्धारित केलेल्या मापदंडात सफल ठरणे आवश्यक

## गांव तलाव

१) साधारण उताराची व पुरेसे पाणलोट असणारी जागा
२) जमिनीची सहज उपलब्धता
३) साधारण कठीण भुस्तर
४) योग्य व दर्जेदार बांधकाम साहित्याची उपलब्धता
५) अंदाजपत्रक शासनाने निर्धारित केलेल्या मापदंडात सफल ठरणे आवश्यक

## कोल्हापुर पद्धतीचे बंधारे

१) नाला नदी स पावासाळा संपलयवर काही काळ प्रवाह असावा
२) पुरेसे पाणलोट असणारी जागा
३) कठीण भुस्तर
४) काठ स्थिर असावेत
५) लाभ क्षेत्रातील लाभार्थी पाणी वापर संस्था तयार करण्यास व तद्नंतर त्या माध्यमातुन बंधा-याचे व पाण्याचे नियमित व्यवस्थपन करण्यास राजी असावेत.
७) योग्य व दर्जेदार बांधकाम साहित्याची उपलब्धताअंदाजपत्रक
८) शासनाने निर्धारित केलेल्या मापदंडात सफल ठरणे आवश्यक

अशा प्रकारची ठिकाणे निदर्शनास आल्यावर त्या ठिकाणांचे निधीच्या उपलब्धतेनुसार विस्तृत सर्वेक्षण खात्यामार्फत केले जाते, सर्वेक्षणानुसार उपलब्ध माहीतीवरुन त्याचे संकल्पन

करुन त्याचे विस्तृत अंदाजपत्रक तयार करण्यात येते, त्यास सक्षम तांत्रिक प्राधिका-याकडून तांत्रिक अनुमती मिळाल्यावर, प्रशासकीय मान्यतेसाठी सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यात येउन त्यास प्रशासकीय मान्यता घेउन तद्नंतर निविदादी कार्यवाही पुर्ण करुन कामे हाती घेण्यात येतात.